महाराष्ट्र शासन
इतर मागासवर्ग व बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
**कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर**
पत्ता : डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, ३ रा माळा, दीक्षाभूमी रोड, श्रद्धानंद पेठ, नागपूर – ४४० ०२२
दूरध्वनी क्र.०७१२- २९५९३८१ CIN No. U85300PN2019NPL187405 ई-मेल: mahajyotiskill@gmail.com

जावक क्र. महाज्योती/नागपूर/ ६९ /२०२३-२४ दि.११/०१/२०२४

**(UPSC इंग्रजी माध्यम)**

## -:परिपत्रक:-

**विषय: संघ लोकसेवा आयोग (UPSC) २०२३-२४ परीक्षा पूर्व प्रशिक्षणासाठी दिल्ली येथे रुजू न झालेल्या विद्यार्थ्यांकरिता सूचना (चौथी यादी)**

महाज्योती नागपूर कार्यालयामार्फत राबविण्यात येत असलेल्या संघ लोकसेवा आयोग (UPSC) २०२३-२४ परीक्षा पूर्व प्रशिक्षण इंग्रजी माध्यमातून दिल्ली करीता एकूण १००० जागा निश्चित करण्यात आलेल्या आहेत. महाज्योतीमार्फत सदर परीक्षा पूर्व प्रशिक्षणाकरीता निवड करण्यात आलेल्या सर्व संस्थेने त्यांच्याकडील असलेल्या जागांकरीता विद्यार्थ्यांचे प्रवेश पूर्ण झालेले आहेत, असे या कार्यालयाला यापूर्वी कळविले होते. तथापि काही विद्यार्थी सदर प्रशिक्षणाकरीता येत नसल्याने त्यांचे प्रवेश रद्द करण्यात यावे, अशी शिफारस संस्थेने या कार्यालयाकडे केलेली आहे. सदर प्रशिक्षणाकरिता विद्यार्थी प्रशिक्षण संस्थेस त्या कालावधीत हजर नसल्यामुळे विद्यार्थ्यांची चौथी यादी यासह जोडण्यात येत आहे. **या सर्व विद्यार्थ्यांनी दि. १८/०१/२०२४ रोजी पर्यंत संबंधित प्रशिक्षण संस्थेस रूजू व्हावे. संबंधित विद्यार्थी प्रशिक्षण संस्थेमध्ये विहित कालावधीत रूजू न झाल्यास त्यांना प्रवेश घ्यावयाचा नाही, असे समजून त्यांचा प्रवेश कायमस्वरूपी रद्द करण्यात येईल व प्रतीक्षा यादी मधून तितक्या संख्येने विद्यार्थी प्रशिक्षण संस्थेला उपलब्ध करून देण्यात येतील, याची सर्व संबंधित विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.**

(स्वा)
(राजेश खवले)
व्यवस्थापकीय संचालक
महात्मा ज्योतिबा फुले संशोधन
व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूर